A **प्रश्नपत्रिका संच** **A**

अकोला जिल्हा पोलीस भरती- 2024-2025

प्रश्नपत्रिका

लेखी परिक्षा : एकुण गुण :- १००
दिनांक :- **१५/०३/२०२६.** वेळ :- **दिड तास (९० मिनिटे)**

उमेदवारांकरीता सुचना.

(१) सदर प्रश्नपुस्तिकेत १०० प्रश्न अनिवार्य आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी.

(२) आपला चेस्ट क्रमांक ह्या चौकोनात | | | | | न विसरता बॉलपेनने लिहावा.

(३) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्याची उत्तरे असून त्यांना **‘A’**,**‘B’**,**‘C’** आणि **‘D’** असे क्रमांक दिलेले आहेत. यापैकी योग्य उत्तराचा क्रमांक उत्तर पत्रिकेवरील सुचने प्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा.

(४) उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमुद करतांना तो संबधित प्रश्नक्रमांका समोर छायांकित करुन दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी ह्याकरीता **फक्त काळया शाईचा बॉलपेन** वापरावा.

(५) खालील नमुन्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निवडलेले वर्तुळ फक्त **काळया शाईच्या बॉलपेनने** संपूर्णपणे छायांकित करुन प्रत्येक प्रश्नांचे उत्तर नमूद करावे. **अयोग्य** पध्दतीने नमूद केलेल्या उत्तरास गुण दिले जाणार नाहीत.



(६) उत्तरपत्रिकांची तपासणी ओ.एम.आर. (OMR) मशीनवर करण्यात येत असल्याने एकदा नमूद केलेली माहिती वा उत्तरे खोडता येणार नाहीत. उत्तरे खोडून नव्याने नमूद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास त्याचे ते उत्तर ग्राह्य मानले जाणार नाही व अशा उत्तरांना शुन्य गुण देण्यात येतील.

(७) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. निगेटिव्ह मार्किंग नाही.

(८) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्न पुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदपत्रावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्‌देशाने केले आहे, असे मानले जाईल.

(९) उमेदवाराने आपले नाव व इतर कोणतीही ओळखीची खूण उत्तरपत्रिकेत करु नये असे आढळून आल्यास उमेदवाराला अपात्र ठरविण्यात येईल.

(१०) मोबाईल व कॅल्क्युलेटरचा वापर करु नये असे आढळल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

नमुना प्रश्न.

प्रश्न क्र. ५१ :- खालील पैकी भारताची राजधानी कोणती आहे.

(A) मुंबई. **(B)** कोलकाता **(C)** नवी दिल्ली **(D)** चेन्नई.

या प्रश्नाचे योग्य उत्तर **(C)** **नवी दिल्ली** असे आहे, त्यामुळे **(C)** हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

उत्तर :-



अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पूरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील ज्या-ज्या प्रश्नक्रमांससमोरील संबंधित वर्तूळ पूर्णपणे छायांकित करुन दाखवावा. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे.

Q.1: 300 ते 500 पर्यंत 3 हा अंक फक्त एकदाच असणाऱ्या संख्या किती?

(A) 90　　(B) 100

(C) 108　　(D) 99

Q.2: . $(a + 2b)^2 = ?$

(A) $2a^2 b^2$　　(B) $a^2 + 4b^2 + 4ab$

(C) $a^2 + 2b^2$　　(D) $(ab)^2$

Q.3: .

शेष सिद्धांताचा उपयोग करून $X^3 + 2X^2 - 4X + 1$ या बहुपदीस $(X - 1)$ ने भागाकार करा आणि बाकी काढा ?

(A) 2　　(B) 0

(C) - 2　　(D) - 4

Q.4: इमारत बांधताना विविध बाबींवरील खर्च दाखवणारा वृत्तालेख दिलेला आहे, इमारत बांधण्याचा एकूण खर्च ₹ 10,80,000 आहे, त्यावरून लोखंडासाठी झालेला खर्च किती ?



(A) ₹ 1,35,000　　(B) ₹ 1,00,000

(C) ₹ 2,70,000　　(D) ₹ 90,000

Q.5: एका थैलीत 1 रुपयांची, 50 पैशांची व 25 पैशांच्या नाण्यांची संख्या समान असून थैलीतील एकूण ₹105 रुपये आहेत तर प्रत्येक प्रकारच्या नाण्यांची संख्या किती ?

(A) 50　　(B) 90

(C) 60　　(D) 21

Q.6: मोटारगाडी A 160 कि.मी. प्रति तास वेगाने धावते तर मोटारगाडी B 140 कि.मी. प्रतितास वेगाने धावते. दोन्ही गाड्या एकाच दिशेने धावतात. मोटारगाडी B ही मोटारगाडी A च्या 80 कि.मी. पुढे आहे. तर मोटारगाडी A ला मोटारगाडी B पर्यंत पोहचण्यास किती वेळ लागेल ?

(A) 4 तास (B) 2.5 तास

(C) 1 तास (D) 15 तास

Q.7: एक पाण्याची टाकी 2/3 भरलेली आहे. ती टाकी एका नळाने 30 तासात भरते तर दुसऱ्या नळाने 10 तासात (रिकामी) होते. जर दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले तर ती टाकी पूर्णपणे रिकामी होण्यास किती तास लागतील?

(A) 10 तास (B) 20 तास

(C) 15 तास (D) 16 तास

Q.8:

$$\sqrt{X+\sqrt{40+\sqrt{68+\sqrt{169}}}}=11$$ तर X ची किमत काढा ?

(A) 124 (B) 114

(C) 0 (D) 104

Q.9: $48 \div 6 \times (5+3) - 4^2 = ?$

(A) 48 (B) 64

(C) 56 (D) 32

Q.10: पहिल्या 150 क्रमवार नैसर्गिक संख्यांच्या घनांची बेरीज किती ?

(A) 11175 (B) 11325

(C) 11475 (D) 11250

Q.11: 5, 10, 17, 26, 37, 50, ?

(A) 84 (B) 100

(C) 65 (D) 42

Q.12: एका वर्तुळाचा परिघ 88 चौ. मीटर आहे. तर वर्तुळाचा व्यास किती मीटर असेल ?

(A) 28 मीटर (B) 9 मीटर

(C) 7 मीटर (D) 14 मीटर

Q.13: 84 मीटर त्रिज्या असणाऱ्या गोलाकार मैदानाला तारेची तिहेरी कुंपण बांधण्यासाठी किती मीटर तार लागेल ?

(A) 1762 मीटर (B) 84 मीटर

(C) 252 मीटर (D) 1584 मीटर

Q.14: $\frac{1}{174X356} + \frac{1}{356X182} - \frac{1}{174X182} = ?$.

(A) $\frac{1}{182}$. (B) . $\frac{1}{356}$

(C) . 0 (D) . 1

Q.15: एक कंपनी एक वस्तु 70 रुपयांना बनविली. ती एका व्यापाऱ्याला 100 रुपयांना विकली. व्यापाऱ्याने ती वस्तु एका दुकानदाराला 200 रुपयांना विकली. नंतर दुकानदाराने तीच वस्तु एका ग्राहकाला 300 रुपयांना विकली. तर कंपनीला झालेला नफा किती टक्के असेल ?

(A) 70 टक्के (B) 328.57 टक्के

(C) 42.86 टक्के (D) 185.7 टक्के

Q.16: 7 पुरुष किंवा 10 महिला एक 100 मीटरची भिंत 10 दिवसात बांधतात. 1000 मीटरची भिंत बांधण्यासाठी 14 पुरुष व 20 महिला किती दिवस घेतील ?

(A) 30 (B) 25

(C) 15 (D) 20

Q.17: एका रकमेचे 10% वार्षिक दराने 146 दिवसांचे व्याज 350 रुपये मिळते तर ती रक्कम कोणती ?

(A) 8750 (B) 6750

(C) 5220 (D) 7865

Q.18: एका व्यक्तीने सायकल ₹ 3680 ला विकत घेतली आणि ती ₹ 3496 ला विकली. तर किती टक्के तोटा होईल ?

(A) 4 % (B) 8 %

(C) 6 % (D) 5 %

Q.19: आठ संख्यांची सरासरी 100 आहे. त्यापैकी एकूण पाच संख्यांची बेरीज 500 आहेत. उर्वरित तीन संख्या 1:2:3 च्या प्रमाणात आहेत. तर ते तीन अंक कोणते ?

(A) 15, 20, 25 (B) 50, 100, 150

(C) 10, 20, 30 (D) 60, 120, 180

Q.20: 4913 चे घनमूळ किती ?

(A) 19 (B) 16

(C) 18 (D) 17

Q.21: धन्याने कॉफी बनवण्यासाठी 10% पाणी असलेले दूध व पाण्याचे 70 लिटर मिश्रण तयार केले. परंतु ग्राहकांना कमी दूध असलेली कडक कॉफी हवी होती. 25% पाणी असलेले मिश्रण तयार करण्यासाठी या मिश्रणात घालाव्या लागणाऱ्या पाण्याची लिटरमध्ये राशी निवडा.

(A) 15 (B) 12

(C) 10 (D) 14

Q.22: 15x + 17y = 22,

17x + 15y = 42,

तर (x + y) = ?

(A) 3 (B) 2

(C) 1 (D) 0

खालील विधानाच्या आधारे पुढील तीन प्रश्नांची उत्तरे द्या.

सात मित्र - A, B, C, D, E, F आणि G हे प्रत्येकजण वेगवेगळ्या शहरात प्रवास करतात आणि प्रत्येकजण वेगवेगळ्या वाहतुकीच्या साधनाचा वापर करतो.

शहरे - दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, जयपूर, पुणे, लखनऊ

वाहतूक साधने - ट्रेन, बस, कार, विमान, सायकल, मेट्रो, जहाज

(वरील यादी दिलेल्या क्रमाने नाही)

1. **D चेन्नईला जातो आणि मेट्रो वापरतो**
2. **जो मुंबईला जातो तो जहाज प्रवास करतो**
3. **जो पुण्याला जातो तो ट्रेन वापरत नाही**
4. **G दिल्लीला जातो**
5. **जो बस वापरतो, तो लखनऊला जातो**
6. **C पुण्याला जातो**
7. **G ट्रेन आणि कार वापरत नाही**
8. **A जहाज वापरतो**
9. **F सायकल वापरतो**
10. **जो दिल्लीला जातो तो विमानाने प्रवास करतो**
11. **B कोलकत्ताला जातो**

Q.23: B कोणते वाहतुकीचे साधन वापरतो?

(A) ट्रेन (B) बस

(C) जहाज (D) विमान

Q.24: E कोणत्या शहरात जातो?

(A) लखनऊ (B) जयपूर

(C) मुंबई (D) यापैकी नाही

Q.25: खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(A) G – दिल्ली – ट्रेन (B) F - जयपूर - सायकल

(C) B - लखनौ - बस (D) C - पुणे - मेट्रो

Q.26: __abbb__b__babb. (रिक्त जागी योग्य पर्याय निवडा)

(A) bab (B) aab

(C) abb (D) bba

Q.27: दोन भावांच्या आजच्या वयाचे गुणोत्तर 3:4 आहे, 6 वर्षांनंतर त्यांचे वयाचे गुणोत्तर 4:5 होईल, तर मोठया भावाचे 5 वर्षांनंतर वय किती ?

(A) 30 वर्षे (B) 24 वर्षे

(C) 18 वर्षे (D) 29 वर्षे

Q.28: जर दिलेल्या अक्षरांच्या शृंखलेतील विषम स्थानावरील अक्षरे काढून टाकल्यास किती स्वर उरतील ?

MISEPIPSOBUSDIVIL

(A) 7 (B) 4

(C) 6 (D) 5

Q.29: 12 मुलांचे सरासरी वय 15 वर्षे असून त्यातील 8 मुलांचे सरासरी वय 16 वर्षे आहे तर उरलेल्या मुलांचे सरासरी वय किती ?

(A) 15 वर्षे (B) 13 वर्षे

(C) 12 वर्षे (D) 17 वर्षे

Q.30: 5 च्या विरुद्ध अंक कोणता ?



(A) 6
(B) 1
(C) 4
(D) 3

Q.31: एका सांकेतिक भाषेत Ramesh is Smart हे शब्द 765 असे लिहीले जातात तर 978 म्हणजे Smart and Beautiful, तसेच 862 म्हणजे Rose is Beautiful तर त्याभाषेत is, Beautiful करिता कोणते अंक वापरले आहेत?

(A) 5,8
(B) 8,6
(C) 6,8
(D) 7,8

Q.32: 1982 ते 2026 वर्षापर्यंत किती लिप वर्ष येतील ?

(A) 12
(B) 13
(C) 11
(D) 10

Q.33: एका शाळेत A,B,C,D व E असे 5 शिक्षक आहेत A व B हिन्दी व इंग्लिश शिकवतात, C व B इंग्लिश व भूगोल शिकवतात. D व A गणित व हिन्दी शिकवतात. E व B इतिहास व फ्रेंच शिकवतात तर कोणता शिक्षक सर्वाधिक विषय शिकवतो ?

(A) A
(B) C
(C) D
(D) B

Q.34: पुढील तक्त्यावरून योग्य पर्याय निवडा ?

225	12	81
169	10	49
121	7	?

(A) 64
(B) 25
(C) 9
(D) 36

Q.35: एका पिशवीत 08 लाल व 03 निळे चेंडु आहेत त्यामधुन 02 चेंडु बाहेर काढले तर दोन्ही चेंडु निळे असण्याची संभाव्यता काढा ?

(A) 3/55 (B) 1/13

(C) 1/5 (D) 14/45

Q.36: आकृतीत किती त्रिकोण आहेत ?



(A) 19 (B) 21

(C) 22 (D) 20

Q.37: खालील विधानासाठी कोणते अनुमान योग्य आहे ?

विधान :

काही उमेदवार खेळाडू आहेत,

काही उमेदवार मेहनती आहेत.

(A) सर्व उमेदवार मेहनती असतीलच (B) सर्व उमेदवार मेहनती आहेत

(C) काही उमेदवार खेळाडू नाहीत (D) वरीलपैकी नाही

Q.38: THROUGH : UJUSZMO :: COSTUME : ?

(A) DIWXZSK (B) DQVXZSL

(C) DOVXZSK (D) DOYZXSL

Q.39: B4Y, D16W, F36U, H64S, ?

(A) L81R (B) J100Q

(C) J81Q (D) J100R

Q.40: एका घडयाळात 03.30 वाजता तास काटा व मिनिट काटा यामधील कोन किती अंशाचा असेल?

(A) 80 अंश (B) 90 अंश

(C) 75 अंश (D) 85 अंश

Q.41: विसंगत घटक निवडा ?

जर्मनी, क्युबा, श्रीलंका, मादागास्कर, न्यूझीलँड

(A) न्यूझीलँड
(B) श्रीलंका
(C) जर्मनी
(D) क्युबा

Q.42: 7.5 वर्षे + 29 महिने - 2.5 वर्षे = ?

(A) 7 वर्षे 5 महीने
(B) 7.5 वर्षे
(C) 6 वर्षे 5 महीने
(D) 6.5 वर्षे

Q.43: 9.8, ? , 8.9, 11.6, 8, 12.5 (प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.)

(A) 11.3
(B) 10.2
(C) 10.7
(D) 12.3

Q.44: एके वर्षी महाराष्ट्र दिन रविवारी आहे तर त्याचवर्षी बालदिन कोणत्या दिवशी असेल ?

(A) मंगळवार
(B) सोमवार
(C) शनिवार
(D) रविवार

Q.45: अ.रामचे गुण राणीपेक्षा जास्त आहेत.

ब.राणीचे गुण रत्नापेक्षा कमी आहेत.

क.रत्नाचे गुण रामपेक्षा जास्त आहेत.

ड. पद्माचे गुण रामपेक्षा जास्त आहेत.

इ. रत्नाचे गुण पद्मापेक्षा जास्त आहेत.

तर सर्वात जास्त गुण कोणाला मिळाले ?

(A) राणी
(B) राम
(C) रत्ना
(D) पद्मा

Q.46: खालील महितीशी सुसंगत असणाऱ्या वेन आकृतीचा पर्याय ओळखा ?

दिलेली माहिती - भारत, छत्तीसगड, उत्तर प्रदेश

(A) .



(B) .

(C) .

(D) .

Q.47: मराठी महीण्याची सुरूवात भाद्रपदपासुन होते असे समजल्यास वर्षाचा सहावा मराठी महीना खालीलपैकी कोणता असेल ?

(A) पौष (B) चैत्र

(C) माघ (D) वैशाख

Q.48: राजनला एकच बहीण आहे राजनच्या भाचीच्या मामीची आई ती राजनची कोण आहे ?

(A) काकू (B) सासू

(C) मामी (D) आजी

Q.49: दिवसातुन किती वेळा मिनिट काटा व तास काटा एकमेकांवर येतात ?

(A) 36 (B) 48

(C) 22 (D) 24

Q.50: .



(A) 124 (B) 108

(C) 98 (D) 118

Q.51: महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणते प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळ UNESCO जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट नाही ?

(A) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) (B) अजिंठा लेणी

(C) एलिफंटा लेणी (D) गेट वे ऑफ इंडिया

Q.52: घरगुती वापरात असलेल्या LPG चे पूर्ण रूप (Full form) काय आहे ?

(A) Liquified Petroleum Gas (B) Liquid Propane Gas

(C) Light Petroleum Gas (D) Liquified Power Gas

Q.53: अकोला पोलीस दलाच्या कोणत्या प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे ?

(A) प्रोजेक्ट SAHYOG (B) प्रोजेक्ट MARVEL

(C) प्रोजेक्ट TRINETRA (D) प्रोजेक्ट MUSKAN

Q.54: भारताची प्रमाण वेळ ग्रीनव्हीच येथील वेळेपेक्षा _______ इतक्या वेळाने पुढे आहे ?

(A) 6 तास 15 मीनिट
(B) 5 तास
(C) 5 तास 30 मीनिट
(D) 4 तास 30 मीनिट

Q.55: नुकताच 'स्टारलिंक' सोबत महाराष्ट्राचा करार झाला. स्टारलिंक कंपनी खालीलपैकी कशासंबंधी आहे?

(A) AI / रोबोटिक्स
(B) इंटरनेट आणि टेलि - कम्युनिकेशन
(C) सेमी कंडक्टर चिप
(D) स्पेस टेलिस्कोप

Q.56: मानवी रक्तातील ऑक्सीजन वहन करण्याचे मुख्य कार्य कोणत्या घटकाद्वारे केले जाते ?

(A) प्लाजमा
(B) प्लेटलेट्स
(C) हिमोग्लोबिन
(D) पांढऱ्या रक्तपेशी

Q.57: अकोला जिल्ह्याची सीमा खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याला लागत नाही ?

(A) यवतमाळ
(B) वाशिम
(C) बुलढाणा
(D) अमरावती

Q.58: 'नरनाळा किल्ला' अकोला जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यामध्ये येतो ?

(A) तेल्हारा
(B) मूर्तीजापुर
(C) अकोट
(D) बाळापुर

Q.59: शिवाजी महाराजांच्या अष्ठप्रधान मंडळापैकी कोणते पद परराष्ट्र मंत्री म्हणून काम बघायचे ?

(A) मंत्री (वाकनीस)
(B) पंत अमात्य
(C) पंत सचिव
(D) पंत सुमंत

Q.60: 'ऑस्ट्रेलियन ओपेन 2026' टेनिस स्पर्धेमध्ये महिला विजेत्या कोण आहेत ?

(A) एलिना रायबाकिना
(B) आर्यना सबालेंका
(C) जेसीका पेगुला
(D) सेरेना विलियम्स

Q.61: बेकायदेशीर अटक व स्थानबध्दता यापासून संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे कोणत्या घटनात्मक तरतुदीनुसार दाद मागता येते ?

(A) मॅंडमस
(B) को वारंटो
(C) हॅबिअस कार्पस
(D) स्थगनादेश

Q.62: खालील दिलेल्या महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांना त्यांच्या भौगोलिक स्थानानुसार 'उत्तर ते दक्षिण' अशा क्रमाने लावा?

1. गोदावरी 2. तापी 3. कृष्णा 4. भीमा

(A) 1-4-2-3
(B) 1-2-4-3
(C) 2-4-1-3
(D) 2-1-4-3

Q.63: RAW संस्थेचे पूर्ण रूप (Full Form) खालीलपैकी कोणते आहे ?

(A) रिजनल अनालिसिस विंग
(B) रिसर्च अँड असेसमेंट विंग
(C) रिसर्च अँड अनालिसिस विंग
(D) रिसर्च अँड ॲडमिनिस्ट्रेशन विंग

Q.64: कोणाला 'अणुबॉम्ब चे जनक' मानले जाते ?

(A) होमी जहांगीर भाभा
(B) जे. रॉबर्ट ओपेनहायमर
(C) अल्फ्रेड नोबेल
(D) आयझॅक न्यूटन

Q.65: खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पोलीस आयुक्तालय नाही ?

(A) अमरावती
(B) नाशिक
(C) कोल्हापूर
(D) सोलापूर

Q.66: अकोला जिल्ह्यात सध्या सर्वाधिक क्षेत्रावर कोणत्या पिकाची लागवड केली जाते ?

(A) कापूस
(B) तूर
(C) ज्वारी
(D) सोयाबीन

Q.67: UPI याचा वाणिज्यमध्ये काय अर्थ आहे ?

(A) Universal Payments Integration
(B) United Payment Interface
(C) Unified Payments Interface
(D) Unified Payments Infrastructure

Q.68: कैलास मंदिराची (एलोरा) निर्मिती कोणत्या राजवटीत झाली ?

(A) मौर्य
(B) सातवाहन
(C) राष्ट्रकूट
(D) चालुक्य

Q.69: नुकताच भारतीय दंड संहिता (IPC) रद्द करून त्या एवजी कोणता नवीन कायदा लागू करण्यात आला आहे ?

(A) भारतीय न्याय संहिता (BNS)
(B) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS)
(C) यापैकी कोणताही नाही.
(D) भारतीय साक्ष अधिनियम (BSA)

Q.70: 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा 2026' खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात झाला ?

(A) यवतमाळ
(B) बुलढाणा
(C) अकोला
(D) वाशिम

Q.71: अरवली, हिमालय, आलप्स, रॉकी हे खालील पैकी कोणत्या प्रकरचे पर्वत आहेत ?

(A) गरीया
(B) ज्वालामुखी
(C) अवशिष्ट
(D) वलीय

Q.72: __________ हा दिवस संविधान दिवस म्हणून भारतात साजरा केला जातो ?

(A) 26 नोव्हेंबर
(B) 26 जानेवारी
(C) 2 ऑक्टोबर
(D) 14 नोव्हेंबर

Q.73: मुंबई उच्च न्यायालयाचे खालीलपैकी कोणत्या शहरात खंडपीठ नाही ?

(A) पणजी
(B) नागपूर
(C) पुणे
(D) कोल्हापूर

Q.74: पोलीस पाटलांची नेमणूक कोणता विभाग करतो ?

(A) जिल्हा परिषद
(B) पोलीस विभाग
(C) महसूल विभाग
(D) ग्राम विकास विभाग

Q.75: रेपोरेट म्हणजे ज्या व्याजदराने _______

(A) RBI भांडवली बाजाराला कर्ज देते
(B) RBI व्यापारी बँकांना कर्ज देते
(C) RBI व्यापारी बँकांकडून कर्ज घेते
(D) RBI भांडवली बाजाराला कर्ज घेते

Q.76: आवृत्तीदर्शक क्रियाविशेषण अव्यये ओळखा ?

(A) सभोवती, सभोवार, अलीकडे, पलीकडे
(B) गल्लोगल्ली, गावोगाव, घरोघर, हरघडी
(C) वारंवार, क्षणोक्षणी, दररोज, पुनःपुन्हा
(D) झटकन, पटकन, पटापट, खटाखट

Q.77: पुढीलपैकी कोणता शब्द प्रत्ययसाधित नाही ?

(A) झोपाळू
(B) पथिक
(C) पुकार
(D) लेखक

Q.78: खालीलपैकी कोणते भाववाचक नाम नाही ?

(A) नवलाई
(B) समता
(C) धैर्य
(D) शांत

Q.79: 'आईच्या कडेवर बाळ होते' या वाक्यातील कर्त्याची विभक्ती ओळखा ?

(A) षष्ठी
(B) पंचमी
(C) चतुर्थी
(D) तृतीया

Q.80: खालीलपैकी विसंगत जोडी कोणती ?

(A) 25 वर्षे - रौप्य महोत्सव
(B) 100 वर्षे - शताब्दी महोत्सव
(C) 50 वर्षे - सुवर्ण महोत्सव
(D) 75 वर्षे - हीरक महोत्सव

Q.81: 'रत्नाकर' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(A) पर्वत
(B) समुद्र
(C) सूर्य
(D) चंद्र

Q.82: अमर पणत्या लावतो. या वाक्यातील अधोरेखित नामाचे वचन ओळखा ?

(A) एकवचन
(B) द्विवचन
(C) बहुवचन
(D) अनाम वचन

Q.83: विशिष्ठ अक्षरांचा किवा शब्दांचा आरोह - अवरोह सुचविण्यासाठी पुढील चिन्ह वापरतात ?

(A) संयोग चिन्ह
(B) लोपचिन्ह
(C) अवग्रह चिन्ह
(D) विकल्पचिन्ह

Q.84: योग्य जोडी लावा

(संधी)	**(प्रकार)**
अ) मनोराज्य	**1) विसर्ग 'र' संधी**
ब) दुरात्मा	**2) अनुनासिक संधी**
क) जगन्नाथ	**3) पूर्वरूप संधी**
ड) चांगलेसे	**4) विसर्ग उकार संधी**

(A) .

अ	**ब**	**क**	**ड**
1	**2**	**3**	**4**

(B) .

अ	**ब**	**क**	**ड**
4	**2**	**3**	**1**

(C) .

अ	**ब**	**क**	**ड**
4	**1**	**2**	**3**

(D) .

अ	**ब**	**क**	**ड**
2	**3**	**4**	**1**

Q.85: 'मला चार मैल चालवते' . या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा ?

(A) संयुक्त क्रियापद
(B) शक्य क्रियापद
(C) प्रायोजक क्रियापद
(D) अनियमित क्रियापद

Q.86: विरूद्धार्थी शब्दांची अयोग्य जोडी ओळखा ?

(A) उघड x गुप्त
(B) आगंतुक x आमंत्रित
(C) काळजी x विवंचना
(D) अनाथ x सनाथ

Q.87: 'देवा, सर्वांना सुखी ठेव'. या वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा ?

(A) विध्यर्थ
(B) स्वार्थ
(C) संकेतार्थ
(D) आज्ञार्थ

Q.88: 'राजाला दिवाळी काय माहीत' ही म्हण कोणत्या अर्थाने वापरली जाते ?

(A) राजाला कायम प्राणहीतची काळजी करावी लागते
(B) राजाला दिवाळी रोजचीच असते
(C) रोजच्या गोष्टीचे नावीन्य वाटत नाही
(D) युद्ध आणि संघर्ष हेच राजाचे जीवन असते

Q.89: वाक्यात प्रयोग होतांना काही शब्दांच्या लिंग वचन रूपात बदल होतो. त्या बदलास ______ म्हणतात ?

(A) विकार
(B) प्रत्यय
(C) प्रकृती
(D) परिवर्तन

Q.90: खालीलपैकी कोणता व्यंजन गट ओष्ठ्य वर्गात येतो ?

(A) ट्, ठ्, ढ्, ण्
(B) प्, फ्, ब्, भ्
(C) त्, थ्, द्, ध्
(D) क्, ख्, ग्, घ्

Q.91: 'शब्दच्छल' या संधीची फोड कशाप्रकारे होईल ?

(A) शब्द + चल
(B) शब्द + छल
(C) शब्द + सल
(D) शब्द + च्छल

Q.92: शुद्ध शब्द ओळखा ?

(A) शीक्षण
(B) क्षत्रीय
(C) सुगरण
(D) स्वभावीक

Q.93: 'मनात मांडे खाणे' या वाक् प्रचाराचा खालीलपैकी योग्य अर्थ कोणता ?

(A) मानसिक भूक भागवणे
(B) कल्पनेतच सुख मिळविणे
(C) एखादी गोष्ट गुप्त ठेवणे
(D) मनोरथ रचणे

Q.94: 'महात्मा गांधी सत्याग्रह करू लागले' या वाक्यातील विधेय ओळखा ?

(A) महात्मा
(B) सत्याग्रह
(C) गांधी
(D) करू लागले

Q.95: 'आम्ही जातो आमुच्या गावा' हे वाक्य कोणत्या प्रकारात मोडते ?

(A) संयुक्तवाक्य
(B) प्रधानवाक्य
(C) मिश्रवाक्य
(D) केवलवाक्य

Q.96: 'बाबाने मुलीला शाळेत पाठवले' . प्रयोग ओळखा ?

(A) कर्तृ - कर्म संकर प्रयोग
(B) कर्म कर्तरी प्रयोग
(C) कर्तृ - भाव संकर प्रयोग
(D) कर्म - भाव संकर प्रयोग

Q.97: 'लाटणी' या अनेकवचनी नामाचे एकवचनी असणारा पर्याय निवडा ?

(A) लाटण
(B) लाटणी
(C) लाटण्या
(D) लाटणे

Q.98: खालीलपैकी नपूसकलिंगी शब्द ओळखा ?

(A) वासरू
(B) भिंत
(C) नदी
(D) दगड

Q.99: खालील चिन्हापैकी अपूर्ण विराम ओळखा ?

(A) !
(B) ?
(C) ;
(D) :

Q.100: 'जन्मखोड' हा सामासिक शब्द कोणत्या समासाचे उदाहरण आहे ?

(A) पंचमी तत्पुरष
(B) षष्ठी तत्पुरष
(C) तृतीया तत्पुरष
(D) चतुर्थी तत्पुरष